खरंच लोकशाही संपली तर ?



लोकशाही संपली तर काय होईल? हा प्रश्न ऐकायला काल्पनिक वाटतो, पण त्याच्या उत्तरात उद्याच्या भारताची चिंता दडलेली आहे. कारण लोकशाहीचा अंत नेहमी रणगाडे रस्त्यावर उतरल्याने, संसदेला कुलूप लागल्याने किंवा संविधानाची पाने जाळल्यानेच होतो असे नाही. कधी तो हळूहळू होतो, प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरवले जाते, विरोधकांना शत्रू मानले जाते, माध्यमांचा आवाज कमकुवत होतो आणि नागरिकांना आपल्या अधिकारांपेक्षा सत्तेच्या नाराजीची भीती अधिक वाटू लागते. इमारती उभ्या राहतात, निवडणुका होतात, भाषणेही सुरू राहतात, पण लोकशाहीचा आत्माच हरवलेला असतो! लोकशाही म्हणजे दर पाच वर्षांनी मतदान करणे एवढाच संकुचित अर्थ नाही. लोकशाही म्हणजे सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार, चुकीच्या निर्णयांना विरोध करण्याचे स्वातंत्र्य, अन्यायाविरुद्ध न्याय मागण्याची संधी आणि प्रत्येक नागरिकाला समान प्रतिष्ठेने जगण्याची हमी. मतपेटी हे लोकशाहीचे महत्त्वाचे साधन आहे; पण नागरिकांचा आवाज, स्वतंत्र संस्था आणि संविधानिक मूल्ये ही तिची खरी शक्ती आहेत.

समजा, निवडणुका होत राहिल्या पण नागरिकांना पर्यायांची माहितीच मिळाली नाही, प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांवर दबाव आला, विरोधी मत मांडणाऱ्यांना धमकावले गेले आणि सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी व्यक्तिपूजा वाढली, तर केवळ मतदानाने लोकशाही जिवंत राहील का? लोकशाहीचे बाह्य स्वरूप टिकवून तिचा गाभा कमकुवत होणे ही अधिक गंभीर धोक्याची घंटा आहे. लोकशाहीत जनता सत्तेची मालक असते, प्रजा नव्हे! सत्ताधारी हे जनतेचे सेवक असतात, तिच्या विवेकावर नियंत्रण ठेवणारे मालक नाहीत. ही जाणीव हरवली, तर नागरिकांचे अधिकार हळूहळू कृपेच्या स्वरूपात मांडले जाऊ लागतात. लोकशाहीचा सर्वांत मोठा शत्रू केवळ हुकूमशाही नसतो, तर प्रश्न विचारण्याची भीतीही असते. रस्त्यावर खड्डे का आहेत, शेतकऱ्याला योग्य भाव का मिळत नाही, तरुणांना रोजगार का नाही, सार्वजनिक निधीचा हिशेब काय, शिक्षण आणि आरोग्य सर्वसामान्यांना परवडणारे का नाही, असे प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. प्रश्न विचारणारा प्रत्येक माणूस विरोधक नसतो, अनेकदा तो व्यवस्थेला तिची जबाबदारी आठवण करून देत असतो.

मात्र, प्रश्न विचारणाऱ्याच्या हेतूवरच संशय घेतला जाऊ लागला, तर प्रश्नांची जागा घोषणांनी घेतली जाते. तथ्यांऐवजी अफवा, चर्चेऐवजी आरडाओरडा आणि उत्तरदायित्वाऐवजी व्यक्तिपूजा यांना महत्त्व मिळू लागते. समाजाला शांत ठेवण्याच्या नावाखाली त्याचा विवेकच गप्प केला गेला, तर ती शांतता नसते; ती लोकशाहीच्या अंतर्मनात पसरलेली भीती असते. देशावर प्रेम करणे म्हणजे सरकारच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन देणे नव्हे. देशावर प्रेम करणे म्हणजे देशातील नागरिकांना न्याय मिळावा, संविधानाचा सन्मान राखला जावा आणि सार्वजनिक सत्तेचा गैरवापर होऊ नये, यासाठी आवाज उठवणे होय. सरकारवर टीका करणे आणि देशाचा द्वेष करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या दोघांमधील फरक पुसला गेला, तर लोकशाहीतील संवादाचा श्वास कोंडतो.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि न्यायाची आशा दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानिक लोकशाहीची पायाभरणी करताना राजकीय लोकशाहीसोबत सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे महत्त्व अधोरेखित केले. मतदानाचा अधिकार समान असला, तरी समाजात संधी, प्रतिष्ठा आणि न्याय यांची विषमता कायम राहिली, तर लोकशाही अपुरी ठरते. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर नागरिकांमध्ये भिंती उभ्या राहिल्या, तर बंधुतेचा पाया हादरतो. बहुसंख्याक असणे म्हणजे प्रत्येक वेळी नैतिकदृष्ट्या योग्य असणे नव्हे; तसेच अल्पसंख्याक असणे म्हणजे अधिकारांपासून वंचित राहणेही नव्हे. लोकशाहीची कसोटी बहुमताच्या सामर्थ्यात नसून, बहुमताने अल्पमताच्या अधिकारांचा किती आदर केला, यात असते. संविधानाचा सन्मान केवळ समारंभात शपथ घेऊन होत नाही. तो अन्यायग्रस्ताला न्याय देताना, महिलांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करताना, वंचितांना संधी उपलब्ध करून देताना आणि सत्तेला कायद्याच्या चौकटीत ठेवताना सिद्ध होतो. संविधान भिंतीवर लावणे सोपे आहे; ते आपल्या वर्तनात उतरवणे ही खरी परीक्षा आहे.

लोकशाही कमकुवत झाली, तर त्याची सर्वांत मोठी किंमत सामान्य माणसाला चुकवावी लागते. श्रीमंत व्यक्ती पर्याय शोधू शकते, प्रभावशाली व्यक्ती आपले हित सुरक्षित करू शकते. पण अन्याय सहन करणारा कामगार, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी, रोजगारासाठी भटकणारा तरुण, शिक्षणासाठी संघर्ष करणारे विद्यार्थी आणि न्यायासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवणारा नागरिक यांच्यासाठी लोकशाही हा केवळ राजकीय शब्द नसतो तर ती जगण्याची आशा असते. लोकशाहीत चूक झाली, तर नागरिक आवाज उठवू शकतो. अन्याय झाला, तर न्यायालयाचे दार ठोठावू शकतो. सत्ता बदलण्याची संधी असते आणि सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर उत्तर द्यावे लागते. ही व्यवस्था अपूर्ण असू शकते; तिच्यात विलंब, भ्रष्टाचार आणि त्रुटी असू शकतात. पण उपाय म्हणजे लोकशाहीचा त्याग नव्हे, तर तिच्या संस्था अधिक पारदर्शक, जबाबदार आणि सक्षम बनवणे हा आहे.

लोकशाहीचे संरक्षण केवळ राजकीय पक्षांचे काम नाही. माध्यमे, न्यायसंस्था, निवडणूक व्यवस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जागरूक नागरिक या सर्वांची त्यात भूमिका आहे. तथ्य तपासून माहिती स्वीकारणे, अफवांना बळी न पडणे, मतभिन्नतेचा आदर करणे, मतदान करणे आणि सार्वजनिक प्रश्नांवर शांततामय व संविधानिक मार्गाने आवाज उठवणे, ही लोकशाही बळकट करण्याची दैनंदिन साधने आहेत. आपल्या विचारांशी सहमत असणाऱ्यांच्या स्वातंत्र्याचे समर्थन करणे सोपे असते, पण आपल्या विरोधात बोलणाऱ्यालाही तोच अधिकार आहे, हे मान्य करणे म्हणजे लोकशाही. असहमतीला शत्रुत्व समजण्याऐवजी संवादाची संधी मानली, तरच समाजात विवेक जिवंत राहतो. लोकशाही ही एकदा मिळाली की कायम सुरक्षित राहणारी संपत्ती नाही. तिचे संरक्षण प्रत्येक पिढीला करावे लागते. नागरिक उदासीन झाले, तर सत्तेवर नियंत्रण ठेवणारी शक्ती कमकुवत होते. म्हणूनच लोकशाही वाचवण्याची सुरुवात संसदेत होण्यापूर्वी आपल्या घरात, शाळेत, कार्यालयात आणि सार्वजनिक चर्चेत झाली पाहिजे.

खरंच, लोकशाही संपली तर? कदाचित राष्ट्रगीत सुरू राहील, ध्वज फडकत राहील, निवडणुकांचे निकाल जाहीर होतील आणि विकासाची आश्वासनेही दिली जातील. पण नागरिकांच्या मनातून निर्भयपणे प्रश्न विचारण्याची हिंमत निघून गेली, न्याय मागण्याची आशा संपली आणि सत्तेला जाब विचारण्याचा अधिकार केवळ कागदावर उरला, तर त्या व्यवस्थेला लोकशाही म्हणायचे तरी कसे? लोकशाहीचा खरा अंत तेव्हा सुरू होतो, जेव्हा नागरिक अन्यायाविरुद्ध बोलणे थांबवतात आणि सत्ताधारी प्रश्नांची उत्तरे देणे थांबवतात! म्हणून आज प्रश्न केवळ लोकशाही संपेल का, हा नाही तर लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आपण काय करतो आहोत, हा आहे. कारण संविधान सरकारला सत्ता देते; पण त्या सत्तेला मर्यादा घालून नागरिकांचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवते. लोकशाही ही कोणत्याही एका पक्षाची, नेत्याची किंवा विचारधारेची मालमत्ता नाही, ती जनतेची सामूहिक जबाबदारी आहे. लोकशाही वाचली, तर नागरिकांचा आवाज वाचेल; नागरिकांचा आवाज वाचला, तर संविधानाचा आत्मा जिवंत राहील. आणि संविधानाचा आत्मा जिवंत राहिला, तरच भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण राष्ट्र म्हणून उभा राहील!

श्री. प्रवीण बागडे
नागपूर, मो.क्र. ९९२३६२०९१९

माझे शॉपिंग पुराण !

मला तरी शॉपिंग करण्याचा भारी कंटाळा येतो बाई! मग ती पुण्यातली तुळशीबाग असूदे, मुंबईचे दादर मार्केट असूदे नाहीतर सोलापुरची नवीपेठ! सगळीकडे तिच गर्दी, तशीच सर्व दुकाने,तस्से बायका,मुली

यांचे घामेघूम तरीही उत्साही, थकलेले तरीही आख्खी दुकाने फिरून शॉपिंग केलेले ढिगारे सावरत लढाई जिंकून यश मिळवल्याचे समाधान कसे ओथंबून वाहत असते प्रत्येक रणरागिणींच्या चेहऱ्यावर, याचे कमालीचे आश्चर्य वाटते कायमच मला.म्हणूनच अलीकडे कित्येक दिवसात शॉपिंगचा संन्यासच घेतला आहे म्हणाना मी तरी! कारण मला मुळात तशी शॉपिंगची आवड नाहीच मुळी!

पुण्यातली तुळशीबाग म्हणजे तरी काय जादु आहे? नुसते नावं काढले तरी बायका, मुली यांच्या उत्साहाला इतके उधाण येते की कधी तर आता यांना आवर घालावा तरी कसा असा प्रश्न पडतो आणि एकदा का तुळशी बागेत गेल्या की किमान २..३ तासांची तरी निश्चिंती! आणि अक्षरशः हुरळून जात , भान हरपुन पोळ सुटल्यासारखे उधळतात. किती आणि काय काय पाहू, किती शॉपिंग करु असे होते अगदी. ३..४ तास फिरून, सर्व तुळशीबाग पालथी घालून ठरवलेली तर शॉपिंग होणारच पण त्यापेक्षा जास्त नको तेवढीअगदी क्लिपा, पिना, आर्टीफिशियल् ज्वेलरी, कपडे, भांडी यासहित अगदी पर्स, टिकली पासून ते पायातील पैंजण, चप्पलपर्यन्त दोन्ही हातात भरभरून कसे बसे ओझे सावरत, मोबाईल, पर्स,दागीने सांभाळत अक्षरशः कसरत करत ,हुश्श हाश्श करत घाम गाळून दमूनच बाहेर येतात. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरचा भाव म्हणजे अगदी जग जिंकल्यासारखा असतो. कधी घरी जातो आणि सर्वांना शॉपिंग दाखवत पुन्हा एकदा सगळे किती घासाघिस करून स्वस्त करून मिळवले ते वर्णन करून सांगतो असे झालेले असते. खरंतर दुकानदार काय तोटा करून विकण्यासाठी दुकान थाटून बसलेले असतात का? तुम्हाला म्हणून स्वस्तात देतो आहे बरका ताई! माझा त्यात खूप तोटा आहे असे म्हणून भासवतात आणि चक्क फसवतात. आणि ते खरे समजून शॉपिंगवेड्या बायका त्याला भुलतात. म्हणूनच मला तरी बाई, शॉपिंगची आजिबात हौसच नाही मुळी!

पण काय आहे ना,कधी कधी मैत्रिणींच्या प्रेमळ आग्रहाखातर त्यांच्यासाठी म्हणून त्यांच्यासोबत जावे लागते. त्या इतकी भरभरून खरेदी करतात मग लाजेकाजे काही ना काही ४..२ ड्रेसेस, ज्वेलरी घ्यावी लागते ती ही अगदी नाईलाज म्हणून ? हो ना, नाहीतर त्यांना मीकंजूष वाटायची ना! नाहीतर मला बाई मूळ्ळीचआवड नाही शॉपिंगची!

खरंच सांगते,विश्वास नाही बसणार.. पण कित्येक दिवसात मी पैसे हातात सुद्धा घेतलेले नाहीत. नोटा,चिल्लर पैसे कोण सांभाळत बसणार उगीच,मला बाई भारीच कंटाळा आहे त्याचा! चिल्लर नाण्यांमुळे उगाच पर्स जड होऊन फाटतात, आणि नोटा म्हणजे डोक्याला ताप.. कधी कधी तर इतक्या जुन्या, झिजलेल्या, फाटक्या, मळक्ट, सेलोटेपने चिकटवलेल्या असतात आणि नेमक्या त्या मलाच येतात. त्या सांभाळणे म्हणजे कठीणच, आणि पुन्हा माझ्याकडून त्या कोणी घेत नाहीत ते वेगळेच. अर्थात पर्सच्या आतल्या खास कप्प्यात यांची चार पाच तरी डेबिटकार्ड ठेवलेली असतात ही गोष्ट निराळी! कारण कधीही त्याची गरज लागते ना..नाहीतर शॉपिंगची तर आवडच नाही ना मला मुळी?

सकाळी हे फिरायला गेले की यांचा येताना फोन येतोच, काय आणायचे आहे आज? भाजी काय आणू ?आणि काल दुधासोबत बटर पण आणायचे म्हणाली होतीस ना?

मग इतके विचारल्यावर दुधासोबत बटर, भाजी, अर्जंट सामान आणि काही बाही सांगावेच लागते आणायला. मग त्यामुळे मला बाहेर खरेदीला जावे लागतच नाही आणि पैसेही लागत नाहीत.

मग बाहेरची ऑफलाईन खरेदी करायची यांना भारी हौस असताना मी कशाला तसदी करून घेऊ ना? तशीही नाहितरी मला शॉपिंगची आवड नाहीच म्हणाना?

बरं,आता किराणा सामान किंवा अगदी काहीही लागले तरी फक्त ऑर्डर केली ऑनलाईन की घरपोच आणि आपल्याला हवे ते मिळते ते सुद्धा पैसे रोख नं देता! हा.. मग त्यासाठी Gpay, phone pay , Nfc tap topay, craid, amezon pay सारख्या बऱ्याच ऍप्स फोनमध्ये मला ठेवाव्याच लागतात ती गोष्ट निराळी, पण प्रत्येक बारीक सारीक गोष्टी साठी शॉपिंगला जावे लागत नाही ना हे महत्वाचे. कारण मला शॉपिंग करण्याचा भारी कंटाळा आहे ना, स्वतः चे आवरा, लिस्ट करा,मग गाडी काढून,वेळ घालवून, तंगड्या दुखेपर्यन्त फिरून ,शोधून ते मिळवायचे मग पिशव्या सांभाळत , ओझी वागवून घरी आणायचे .आता इतके करून जर मनासारखं नाही जमलं तर पुन्हा एखादी वस्तू बदलण्यासाठीसुद्धा पुन्हा तेच सगळे करायचे? बाई, बाई.. कित्ती बोअरिंग आहे ना हे सगळे?

त्यापेक्षा काळाप्रमाणे आपणही बदलावे हे मला पटते. तशी मी अगदी मॉडर्न विचारांचीच आहे ना?त्यामुळे या सर्व दिव्यातून जाऊन शॉपिंग करण्यापेक्षा मी आता कधीही वेळ मिळेल तेंव्हा सहज मोबाईल वरच्या ॲप्स पाहिल्या की एकापेक्षा एक सुंदर सुंदर ड्रेसेस,साड्या, ज्वेलरी पासून ते घरातील दररोज लागणाऱ्या वाण सामानापासुन् ते मेडीकल, स्टेशनरी अशा काही छोट्या,

मोठ्या कोणत्याही वस्तु सहज बोटांवर मागवू शकते.जेवण बनवायचा कंटाळा आला की अगदी पिझ्झा पासून ते पावभाजी पर्यंत इंडियन,कॉन्टीनेंटल काहीही ऑर्डर करते, त्यासाठी पैसेही जवळ बाळगण्याची गरजच नसतेच ना? आणि मला तरी यांना सांगावेसुद्धा लागत नाही बरकां , कारण यांचे कधी लक्षच नसते ,आणि दुसरे म्हणजे हे अगदीच विसरभोळे आहेत. फक्त 'अकाउंट वरचे पैसे संपत आले आहेत बरका, नाहीतर चूकून वापराल आणि पंचाईत होईल,' म्हटले की लग्गेच १० हजार टाका म्हटले तर २० हजार टाकतील. मग काय, इतकी छान फॅसिलिटी असताना कशाला हवी ती शॉपिंगची कटकट?बाकीच्यांसारखी हौस नाही ना मला शॉपिंगची!



आता एक मात्र झाले आहे या ऑनलाईन व्यवहारामुळे , अगदी रस्त्यावरच्या छोट्या विक्रेत्यांपासून ते मॉल मधील मोठ्या वस्तूनपर्यंतचे सर्वजण अगदी तरबेज झाले आहेत. सगळ्यांकडे स्कॅनर असतो,सर्वांना ऑफर लेवश, वगैरेची अगदी शेम्बड्या पोरापासून सर्वांना माहिती आहे. एकदा तर सिग्नलवरच्या भिकाऱ्याला सुट्टे नाहीत म्हणाले तर चक्क सरू करा म्हणाला, आता बोला!

या होम डिलिव्हरी मुळे घरबसल्या शॉपिंग पण होते,शिवाय आवडले नाही किंवा चुकीचे आले तर रिटर्न सुद्धा करता येते. ही छान सोय आहे,पण कधी कधी ना, याचाही इतका ताप होतो की अगदी नको,नको होते हे! दिवसभर सारखे कुरिअरवाले भंडावुन सोडतात. सर्वांना वाटते,ही काय घरात तर बसलेली असते, काय काम असते हिला..पण एक दिवस फक्त घरात राहून दाखवा, मग समजेल. मला तरी कधी कधी वाटते यासाठी एखादा स्पेशल गडी ठेवावा आलेले पार्सल घेणे आणि रिटर्नचे देण्यासाठी.

मुले, सुना तरी इतक्या सारख्या गोष्टी मागवत असतात ना,की अगदी गोंधळच होतो बाई माझा तरी,नेमका हा आलेला माणूस कोणाचे पार्सल द्यायला आला आहे की परत नेण्यासाठी आला आहे, बर फक्त दिले ..घेतले की काम झाले असे नाही तर पुन्हा कोणाचे असेल त्याला फोन करून त्याचा कोड मागवून तो सांगायचा मग ही प्रोसेस पूर्ण होणार. हुश्शय करून बसले की पुन्हा ठणाणा बेल वाजते अन

दुसरे पार्सल हजर असते. बर,त्यांना काही वेळ ही ठरावीक नसते. जेवायला बसा, नाहीतर थोडेसे आडवे होण्याचा विचार केला तरी हे हजर होतात वैऱ्यासारखे? पण काय करणार..

मोठी सुन सारीका ही ऑनलाईन ज्वेलरीचा बिझनेस करते. तिला काही आवडले की ती माझ्यासाठीही ऑर्डर करते. नवीन काहीही सुंदर असले की मला मिळतेच,मग ते सुन्दर डिझाइनचे मंगळसूत्र असूदे नाहीतर बांगडया! मग मला त्याचीही आता शॉपिंगची गरज भासत नाही. तशीही मला शॉपिंगची आवड नाहीच म्हणा ना?

मध्यंतरी दुपारी जेवण झाले होते मस्त गोडाचे, थोडी वामकुक्षी घेऊ म्हटले,डोळा लागतो नं लागतो तोच, बेल वाजलीच. . इतके जीवावर आले होते उठायचे पण करणार काय? सगळेजण जॉबला गेलेले. एकटीच सापडले घरात, मग काय ,चडफडत उठले,पार्सल घेतले. धाकट्या सुनबाई अनुशीचे होते. पाठोपाठ तिचा फोन पण आला.. आता दार उघडून पार्सल घेऊ की तिचा फोन आधी घेऊ.. फोन घेतल्यावर म्हणाली,'आई, पार्सल आले असेल ते घेता का प्लिज?' नं घेऊन करते काय? आता ऑर्डर केली की पार्सल कुठपर्यंत आले हे पण समजते ,त्याचा हा परिणाम! हा चांगला की त्रासदायक ते मात्र जो घेतो त्यालाच समजते. घरी आल्यावर अनुशीला आज सांगतेच,सारखे ऑर्डर करत जाऊ नका म्हणून ! सांगायचे ठरवले खरे,पणआल्या आल्या तिनेच सांगितले आई, काल कपड्यांच्या घड्या करताना तुमची ब्लॅक लेगीन थोडी जुनी झालेली दिसली म्हणून कालच ब्लॅक आणि एक ऑफव्हाईट कलरची ऑर्डर केली. ट्राय करून पहा, बरोबर आहे का ते.. नाहीतर रिटर्न करते लगेंच. आता बोला, अशा सुनांना काय बोलणार? त्यांच्या बरोबरीने अगदी लक्षात ठेवून माझ्यासाठी पण ऑर्डर करतात. आता मग मी कसले शॉपिंग करणार? तशीही मला शॉपिंगची आवड नाहीच म्हणा?

तरी मी विचार केलाच होता, पुढच्या महिन्यात मागवायचा ऑनलाईन, काय झाले ना ,आत्ताच मागवली असती खरे,पण कालच आमच्या किटी पार्टी मध्ये एक मैत्रीण हॅन्डलूमच्या खूप छान छान वस्तू घेऊन आली होती विकायला. सगळ्यांनी भरपूर काही ना काही घेतले. मग मी पण ५ ..६ पर्स, छोटे गालिचे ..अशा काही वस्तू घेतल्या माझ्यासाठी नाही बरका,आमच्याकडे सारखे कुणी ना कुणी येत असते, मग त्यांना गिफ्ट काय द्यावी हा प्रश्न मलाच पडतो, म्हणून घेतले,बिल पाहिले तर साडे चार हजार झाले. आता एकदा घेतल्या म्हटल्यावर कमी करणे बरे दिसते का, म्हणून घेतले सारेच. आता आज पुन्हा ऑर्डर करायची लेगिन्सची हे बरे दिसणार नाही ना, म्हणून नंतर ऑर्डर करु म्हटले होते,तर अनुश्रीने परस्पर मागवलीसुद्धा! आता मी काय करणार बिचारी! आता इतक्या प्रेमाने मागवतात तर नाही तरी कसे म्हणणार ना?

आधी ऑफलाईन संन्यास घ्यायचा हे यांच्याम ुळेठरवत होतेच मनाशी पण आता वाटतेय, ही सुद्धा खरेदी करणे म्हणजे मोबाईल मध्ये आधी सर्च करा, मग ऑर्डर करा,पेमेंट ऑप्शन मध्ये जाऊन पेमेन्ट करा.. हा त्रास तरी कशाला करून घ्यावा? तशीही मला मुळी हौसच् नाही ना, शॉपिंगची!

माझी नात सिया वर्ष दिड वर्षाची असताना तिला एकदा अढच् मध्ये घेऊन गेले होते. तिने विचारले, हे काय आहे ? मी तिला सांगितले इथे पैसे मिळतात ,हे कार्ड मशीन मध्ये असे घातल्यावरती. समजले तिला. नंतर अशीच बाहेर गेले तेंव्हा तिने खेळणीसाठी हट्ट केला. मी म्हणाले,'अगं सिया,पैसे नाही ना आणले मी,कशी घेणार ,आपण घरी जाऊ ,पैसे घेऊन मग खेळणी घ्यायला येऊ परत!' त्यावर ती लग्गेच म्हणाली,' आजी,घरी कशाला जायचे, इथे मिळतात ना पैसे!' इतके नवलं आणि कौतुक वाटले मला..

इतक्या सोयी असूनही बायका अजूनही चक्क उत्साहाने चल गं, तुळशीबागेत आता काय नवीन आलेय ते पाहून येऊ म्हणत कशा काय जातात याचे खरंच नवलं आणि कौतुकसुद्धा वाटते. सणासुदीला, त्यातही गौरी गणपती, दसरा..दिवाळी अशा उत्सवाच्या दिवसात तर बघायलाच नको. मला शॉपिंगची आवड नाही म्हणून बरं,आता तर खरंच मी यांच्यासारखे हौशी ऑफलाईनशॉपिंगवाले असल्यामुळे हीशॉपिंग करण्याचा संन्यास घ्यायचा हे तर पक्के ठरवूनच टाकले आहे मुळी आणि इतक्या छान,हुशार आणि माझी शॉपिंगची काळजी घेणाऱ्या दोन दोन सुना असल्यावर मला ऑनलाईन शॉपिंगची पण गरजच नाही ना? ऑनलाईन शॉपिंगचाही आता संन्यासच घेऊन टाकते पहा.

थोडयाच दिवसात आता सिया सुद्धा माझ्यासाठी शॉपिंग करेलच,मग तर काय विचारायलाच नको! तशीही मला शॉपिंगची आवड नाहीच मुळी !

पण सणाचे दिवस आले,आता शेजारणी येतीलच विचारायला .. येता का वहिनी, बरोबर चला तरी म्हणून आग्रहच करतात, मग काय करणार? जावेच लागेल, मला कोणाचे मन मोडायला नको वाटते ना, आणि मग इतके कष्टाने गेलेच आहे तर काहीतरी शॉपिंगसुद्धा करावेच लागेल ना, नाईलाजाने! कारण तशी मला शॉपिंगची आजीबात आवडच नाही मुळी!

'डिंगडाँग.. ' वाजलीच पहा बेल! आता कोण आले बाई? म्हणत दार उघडले तर समोर कुरिअरवाला! काकू, तुमचे पार्सल.. म्हणत जणू मला दारोदार फिरवता काय,होऊदे तुम्हालाही असाच त्रास असे मनातल्यामनात म्हणत खिजवल्यासारखा भलेमोठ्ठे पार्सल घेऊन दत्त म्हणून उभा होता. बघते आता कोणी मागवले आहे ते.. मी तरी ऑर्डर केलेले नाही बहुतेक, कारण विनाकारण शॉपिंग करण्याची मला आवडच नाहीये ना? अरेच्या! कॉर्डसेट आला वाटतं माझा! परवा शेजारच्या आरतीने मागवला होता पिंक कलरचा! सुंदरच होता.

मला आवडला म्हटल्यावर तर ती मागेंच लागली, तुम्हीही ऑर्डर करा ना ,इतका आवडलाय तर,म्हणून? मग काय, केला एकदाचा ऑर्डर ,पण तीने आग्रह केला म्हणून हो! नाहीतर मला तरी बाई मूळीच आवड नाही शॉपिंगची!.. आले..आले.



सौ. स्नेहा मुसरीफ
पुणे.
मो.९५०३४३४४२४

भावाच्या पवित्र प्रेमाचा मंगल आणि उत्कृष्ट सण – भाऊबीज

दीप+आवली (रांग) म्हणजे दीपावली. आनंद, उत्साह, चैतन्य घेऊन येणारी दिवाळी आपल्याबरोबर आश्विन वद्य द्वादशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत सणांची रांगच घेऊन येते. गरीब-श्रीमंत-लहान-थोर या सार्यांच्या अंत:करणात स्नेहभाव जागवते.

नरक चतुर्दशीपासून ते भाऊबीज हे चार दिवस दिवाळीत प्रमुख मानले जातात; परंतु विजयादशमीपासून या उत्सव सोहळ्याची प्रक्रिया सुरू होते. आश्विन वैद्य द्वादशीला गोवत्स दशमी किंवा वसुबारस म्हणतात. स्त्रिया उपवास करून संध्याकाळी भक्तिभावाने धेनूची पूजा करतात. आश्विनी वद्य त्रयोदशीला धनत्रयोदशी म्हणतात. भगवान श्रीकृष्णाने दुष्ट नरकासूर राक्षसाचा वध करून स्त्रियांची मुक्तता केली. ही घटना आश्विन वद्य चतुर्दशीला घडली. तेव्हापासून तो दिवस दीपोत्सव म्हणून साजरा होतो. आश्विन वद्य अमावास्येला लक्ष्मीपूजन म्हणतात. उदार बळीराजाच्या स्मरणार्थ लोक बळीची पूजा करतात. दिवाळीचा अत्यंत महत्त्वाचा महत्तम - मौलिक सण म्हणजे भाऊबीज होय. यास यमद्वितीयाही म्हणतात. या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवावयास गेला व नरकात पिचत पडलेल्या जीवांना त्या दिवसापुरते मोकळे केले. म्हणून या दिवशी भावाने बहिणीकडे जावे आणि बहिणीने भावाला ओवाळावे. बहीण-भावाच्या प्रेमाचा हा अत्यंत मंगल दिवस 'भाऊबीज' म्हणून साजरा केला जातो.

बहीण भावाला आदराने, प्रेमाने ओवाळते.



आपल्या भावाला अपमृत्यू येऊ नये, तो चिरंजीव राहावा, अशी ती प्रार्थना करते. अपमृत्यू निवारणार्थ 'श्री यमधर्मप्रीत्यर्थ यमतर्पणं करिष्ये।' असा संकल्प करून यमाचे १४ नावांनी तर्पण करावे. हा विधी पंचांगात असतो. याच दिवशी यमाला दीपदान करावयाचे असते. यम ही मृत्यूची देवता आहे. प्रत्येकाला मरण अटळ आहे. ही जाणीव सतत असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्याकडून वाईट कार्य व धनाचा अपव्यच होणार नाही.

तेव्हा यमाला दीपदान करून सांगावयाचे की, 'हे यमा, या दीपाप्रमाणे आम्ही सतर्क आहोत. जागरूक आहोत. त्याचे प्रतीक असलेला दीप तुला अर्पण करत आहोत. त्याचा स्वीकार कर. कारण तुझे आगमन केव्हा होईल, हे आम्हाला माहिती नाही.'या दिवशी बहीण भावाला औक्षण करते. भाऊ नसेल तर बहीण चंद्राला ओवाळते. बहीण-भावाच्या अमर प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा दिवाळीतील सवरेत्तम सण होय. बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा इतका मंगल आणि उत्कृष्ट सण नाही. बंगालमध्ये नडिया जिल्ह्यात विरही गावी 'भातृद्वितीया' जत्रा भरते. भाऊबीजेच्या दिवशी भरणारी ही एकमेव जत्रा आहे. उत्तर प्रदेशात तर भाऊबीजेचे व्रत असते. त्या दिवशी स्त्रिया संपूर्ण अंगणभर तांदळाच्या पीठाच्या भव्य रांगोळ्या काढतात.भावाला ओवाळण्याची प्रथा मात्र भारतात सर्वत्र आहे.

श्री.भास्कर देवराव शिनगारे
मु.पो. बेंद्री ता. भोकर जि.नांदेड





प्रबोधिनी दिवाळी



वैष्णवशिव एकरुप
कार्तिकी शुद्ध दिनी
घडलासे महा योग
एकादशी प्रबोधिनी

होई जागे शुभदिनी
विष्णू योग निंद्रेतूनि
चातुर्मास रे सुसंपन्न
घडले पुण्य हातूनि

देव उठी एकादशी
नाम दुजे देवोत्थनी
रमतो पुन्हा युगांधर
श्रीहरी सृष्टी पालनी

बेलपत्र वाहू शकतो
आज रे विष्णूचरणी
तुलसी पत्र प्रिय तम
धारतो तो शूलपाणी

उपवासेअन्न त्यागले
उजळली जठर धुनी
संतृप्त झाले जीवन
ईश्वराचे नाम वदनी

हरि हराची भेट होई
भेदा भेद नको मनी
भक्ती रसा लीन होई
सांप्रदायसिमोलंघनी

तुलसीविवाह आरंभ
चालतो आजपासूनि
व्रतस्थ राही हरिदास
विठ्ठलाच्या उपासनी

धर्म अन् शास्त्रसांगड
दिवाळीचे हरेक दिनी
उर्जा पुरे ती सालभरी
एक पणती जागेमनी

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

























नगर पंचायत कार्यालय

पालम जि.परभणी

"स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी अभियान"

स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत नगरपंचायत पालम तर्फे शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

प्रिय पालम शहरवासीयांनो,यंदाची दिवाळी आपण सर्वांनी मिळून पर्यावरणाचे रक्षण करणारी, स्वच्छ, सुंदर आणि आनंदी साजरी करूया. नगर पंचायत पालम आपणास नम्र आवाहन करीत आहे की –

1. ही दिवाळी प्रदूषण मुक्त: फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण टाळून स्वच्छ व हिरवीगार दिवाळी साजरी करूया.
2. ध्वनी व वायू प्रदूषण मुक्त: मोठ्या आवाजाचे फटाके वाजवू नका. ध्वनी व वायू प्रदूषणापासून आपल्या बालकांचे, वृद्धांचे व मुक्या प्राण्यांचे रक्षण करा.
3. चार प्रकारचा वर्गीकृत कचरा: दिवाळीच्या साफसफाईतून निघणारा कचरा - ओला कचरा, सुका कचरा, घातक कचरा व सॅनिटरी कचरा असे चार प्रकारात वेगळा करूनच नगर पंचायतीच्या घंटागाडीला द्या.
4. अक्षय ऊर्जा - सौर ऊर्जा: दिवाळीच्या रोषणाईसाठी सौर दिवे, सौर कंदील यांचा वापर करा. विजेची बचत करा.
5. इलेक्ट्रिकल वाहनांचा वापर: शक्य असेल तेथे ई-वाहनांचा वापर करा, प्रदूषण कमी करा.
6. प्लास्टिक मुक्त दिवाळी: प्लास्टिक पिशव्या, थर्माकोलचे साहित्य वापरू नका. कापडी पिशवीचा वापर करा.
7. पर्यावरण पूरक स्थानिक उत्पादनांचा वापर: कुंभार बांधवांनी बनविलेल्या मातीच्या पणत्या, स्थानिक कारागिरांचे आकाश कंदील व फराळ खरेदी करून - Vocal for Local ला प्रोत्साहन द्या.
8. झाडे लावा, झाडे जगवा: या दिवाळीत एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करा.
9. रेन वॉटर हार्वेस्टिंग - पाण्याचे पुनर्भरण: आपल्या घराच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत जिरवा, भूजल पातळी वाढवा.
10. पाणी बचत करा - नळाला तोटी बसवा: पाणी हे जीवन आहे. नळाला तोटी बसवा, गळती थांबवा, थेंब थेंब वाचवा.
11. माझी वसुंधरा शपथ: मी माझ्या वसुंधरेचे रक्षण करीन, पर्यावरणाचे संवर्धन करीन अशी शपथ घेऊया.
12. नगरपालिकेच्या करांचा भरणा वेळेत करा: आपल्या शहराच्या विकासासाठी पाणीपट्टी, घरपट्टी व इतर करांचा भरणा वेळेत करून प्रशासनास सहकार्य करा.

चला तर मग, यंदाची दिवाळी - प्रदूषण मुक्त, स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरण पूरक साजरी करूया !
!माझी वसुंधरा - माझी जबाबदारी

! सर्व नागरीकांना दिपावलीच्या हार्दीक शुभेच्छा !

मा.श्री.युवराज पौळ	मा.श्री.भास्करराव सिरस्कर	श्रीमती अनवरीबी हिदायतुलाखाँ पठाण
मुख्याधिकारी	उपनगराध्यक्ष	नगराध्यक्षा
नगर पंचायत पालम	नगर पंचायत पालम	नगर पंचायत पालम



























वृक्षवल्ली

झाडे आमुचे जीवन
त्यांचे उपकार धन्य
यांच्या सम उपयोगी
नाही कुठे कुणी अन्य

देती हवेत गारवा
सावलीही देती खास
पावसा देती आव्हान
पशु पक्षांचे निवास

यांचे पोषण कार्बन
प्राणवायू आम्हा देती
औषधी गुण यांच्यात
माती धूप थांबविती

फळे बनविती पुष्ट
गुण चव त्यांची इष्ट
वेळ काळ बांधिलकी
नको लागू यांना दृष्ट

डॉ. सौ. अनुपमा पाटील
ठाणे































बा बारिक..

स्पर्धा असे महिलात
मीचं कशी गं बारिक
झिरो फिगर प्रियतम
वजन वाढता चिरिक

स्लीम होण्या करिता
सारे क्लासेस शरीक
हाडे काडे दिसो जरी
म्हणायचे नसते वीक

गळ्याची हाडे उठावी
हे तर सौंदर्याचेप्रतिक
आई विचारते चिंतेने
कितीझाली गं बारिक

मुठभर मास चढेल गं
मुलीलावाटे कवतिक
तोळाभर वजनवाढते
होई मणभर अगतिक

चिंता ग्रासली बापाला
कशी जुळेल सोयरीक
कुपोषित वाटते पोरगी
कसे व्हावे गो उदयिक

स्कीम काढे नवनवीन
जीमवाले व्यावहारिक
ए आय फोटो दाखवी
जाहिरातबाजीअधिक

बारीक होण्यावरखर्च
बजेटबिघडे आधुनिक
मायबाप काढती कर्ज
पोट्टे काढती पिकनिक

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
शुभ दीपावली
कॉ. विनोद भिवा निकोले
विद्यमान आमदार
डहाणू विधानसभा मतदार संघ

बल्लारपूर शहरातील समस्त जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
दीपावली शुभचिंतन
: शुभेच्छुक :
डॉ.अल्का अनिल वाढई
(नगराध्यक्षा)
नगर परिषद बल्लारपूर

सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभ दीपावली
सौ.श्री.बबन मुकादम साहेब
सभापती : स्थायी समिती (पनवेल महानगरपालिका)
सौ.प्रिया बबन मुकादम
अध्यक्ष : उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चा

सर्व नागरिकांना
दीपावलीच्या व पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...
हरीश पाटील ढवस
अध्यक्ष : भाजप तालुका -पोंभूर्णा, जि.चंद्रपूर

सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व समस्त नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
स्थापना | बिना सहकार नही उद्धार | वर्ष २००४
नागपूर विभाग शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित चंद्रपूर,रजि नं. ११८
कार्यक्षेत्र : नागपूर व अमरावती विभाग
सभासद संख्या - ७९१८
सभासद कर्ज - ५,४३,३९,३०,२०८.१३/-
गुंतवणूक - २,२७,८७,२७,०४०.०७/-
दि ३१/०३/२०२६ चा ताळेबंद रु. ८,०२,०४,५७,३४३.०९/-
दि ३१/०३/२०२६ चा नफा - ६,५२,६९,७०१.५२/-
भागभांडवल - ५०,४४,४५,०२५/-
ठेवी - ६,९०,३६,७५,३९७.०५/-
निधी - २६,०१,२३,६१०.५२/-
लाभांष -१०%
ऑडिट वर्ग सतत - "अ"
* संस्थेच्या एकूण शाखा - १७
* संस्थेची स्वतंत्र इमारत - चंद्रपूर, नागपूर, हिंगणघाट, गडचिरोली, गडचांदूर
* मुख्यशाखा - चंद्रपूर * उपशाखा - चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, गडचांदुर, वरोरा, ब्रम्हपुरी, नागेपल्ली, हिंगणघाट, वर्धा, तळेगाव (श्यामपंत), भंडारा, आष्टी, गोंदिया, उमरेड, कोहमारा, वरुड
"विश्वासाने गुंतवणूक करावी अशी व कर्जदार सभासद मयत झाल्यास १०० टक्के कर्जमाफ करणारी महाराष्ट्रातील एकमेव कर्मचारी सहकारी पतसंस्था"
साधारण कर्ज ५०.०० लक्ष
मध्यम मुदती कर्ज - ५.०० लक्ष
आकस्मिक कर्ज - ८० हजार
साधारण, मध्यम मुदती कर्ज, आकस्मिक कर्ज व्याजदर, द.सा.द.शे.
११%
१) सर्व प्रकारच्या कर्जाची महतम मर्यादा ५० लक्ष राहील.
२) वेतनाच्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात येतील.
ठेवीवरील व्याजदर द.सा.द.शे.
१) मासिक आवर्त ठेव -१ ते ५ वर्ष ९% २) मुदत ठेव- १ ते ५ वर्ष ९%
३) मासिक आय योजना -रु. १,००,०००/- गुंतवा द.सा.द.शे.८.४०% दराने दरमहा मिळवा रु ७००/- व्याज मिळवा.
४) भाग्यलक्ष्मी आवर्त ठेव - दरमहा रु १०००/- च्या आवर्त ठेवी गुंतवणुकीच्या ७७ महिन्यानंतर रु १,००,०००/- मिळेल.
५) दामदुप्पट योजना - ९६ महिन्यानंतर दामदुप्पट (८ वर्ष)
श्री. सुरेंद्र अडबाले अध्यक्ष तथा गटनेता, मनपा, चंद्रपूर
श्री. सुनिल शेरकी उपाध्यक्ष
श्री. दिनकर अडबाले मा. सचिव
श्री. शरद डांगे खजिनदार
आमदार श्री. सुधाकर अडबाले
(महाराष्ट्र विधान परिषद)
संस्थापक अध्यक्ष तथा तज्ञ संचालक
नागपूर विभाग शि.क.स. पतसंस्था, चंद्रपूर
संचालक : श्री. ज्ञानेश्वर सोनकुसरे, श्री. मनिष कङ्गमवार, श्री. विनोद रणदिवे, श्री. किशोर पाचभाई, श्री. नितीन जिवतोडे, सौ. शिला ताजणे, श्रीमती चारुशिला जोगी, श्री. सचिन मोहितकर, श्री. श्रीकांत पोडे, श्री. प्रकाश अडबाले (कार्यलक्षी संचालक)

सर्व नागरिकांना
दीपावलीच्या व पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...
हरीश पाटील ढवस
अध्यक्ष : भाजप तालुका -पोंभूर्णा, जि.चंद्रपूर

समस्त नागरिकांना
दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
श्री. शैलेश मनोहर पाटील
नगरसेवक ठा.म.पा.
दिवा विकास प्रतिष्ठान अध्यक्ष
दिवा शहर प्रमुख
कु.संचित पाटील

WARRIOR TAEKWONDO ACADEMY
Best wishesh for Diwali
Happy Diwali
Aryan Sandeep Yewale
International Player
Sara Sandeep Yewale
International Player
Add:- Saraswati Vidya Mandir School, Bhatwadi Ghatkopar (w)
Mob.90826 00938

समस्त नागरिकांना
दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा...!
शुभ दीपावली
श्री. भरत कृष्णा भोईर
नगरसेवक (प्रभाग क्रमांक १४)
सभापती (एच प्रभाग समिती) नवी मुंबई महानगरपालिका

आय..

गाजावाजाशास्त्रज्ञांचा
अद्भुत शोध लावलायं
चुटकीसरशी देई उत्तर
आणले आता ए आय

एकटा करे कैक कामे
म्हणतो सांग हवे काय
आकर्षक सजवू सुपुर्द
सोयीसुविधा हायफाय

मागेचंआले रे ए आय
देवाने दिली सर्वांआय
मशीनसुध्दा फिके पडे
अशीआपली असेमाय

नमागता देईलं इप्सित
ती कामधेनु जणू गाय
पदार्थ जे खावेसे वाटे
अन्नपूर्णावाढते जेवायं

कठिणकार्य हो सफल
तिचा आशिर्वाद हवायं
थकवा पळून जाई पार
तिचा पाठी हात ठेवायं

शिकवण तिचीअमूल्य
जशी दुधा स्नेहळ साय
बोल ऐकावे अनुभवाचे
सर्व समस्येवरती उपाय

अ दृश्य मदत सोबतीस
वाटेलं कधीही असहाय
अद्भुत शक्ती रंध्रा रंध्रात
धरावे स्मरावे तिचे पाय

गुगल मॅप दाखवी रस्ता
मदतकरे कुठेही पोचायं
माय करते सुमार्ग दर्शन
सांगे योग्यमाणूसबनाय

आधीनोंद करावी लागे
तेंव्हाकाम करी ए आय
योग्य ते ते करते सु पुर्द
माय मागितल्याशिवाय

विश्व निर्मात्याची देणगी
अशी नअन्यआस्तिकाय
आपणठरवा हवे रे काय
ए आय का आपलीआय

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

मेहुणास्त्र

युध्दजिंके पत्नी नीत
तिच्याकडे मेहुणास्त्र
चारीमुंड्यां मीचंचीत
करून टाकते परास्त्र

बायकोकडे राखीव रे
सासू नावाचे ब्रह्मास्त्र
एकला मी काय करी
सासूर वाडी उच्छास्त्र

प्रतिज्ञा करु टाके मी
करी ना धरणार शस्त्र
मेहुणा खुश बाई खुश
जाणावे खरे हे शास्त्र

पुरेपूर पुरवे मेहुण्यांस
निवारा अन् अन्नवस्त्र
वाढतावाढता वाढत्या
मागण्यात्यांचे अजस्त्र

गुपिते माझे शोधू काढे
कधी करु शके निर्वस्त्र
सासरा आतले गाठीचा
सहज करुपाहे निशस्त्र

मेहुणी लाघवी देखणी
सेना माझीहो चतुरस्त्र
वाळवंटात ओअॅसिस
गुन्हे माफ सारे सहस्त्र

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६...